परिप्रेक्ष्य

# अस्मितेचे मायाजाल

चंद्रशेखर पुरंदरे



मराठी अस्मिता म्हणजे नक्की काय हा प्रश्न मला गेली बरीच वर्षे पडलेला आहे. गेली चौदा-पंधरा वर्षे मी ब्रिटनमध्ये आहे. त्या आधीच्या काळातील तीस वर्षे पुण्यात गेली. ब्रिटनमधल्या वास्तव्यातील अकरा वर्षे स्कॉटलंडमधील पर्थ नावाच्या शहरात गेली. तेथे मराठी किंवा भारतीय सोडाच पण गोरा नसलेला माणूसही दिसत नसे.

या परिस्थितीचे अनेक पदर सहज लक्षात यावेत. मराठी, हिंदी, इंग्रजी (भारतीय उच्चाराचे!) बोलण्याची शक्यता शून्य. टी.व्ही.वरचे कार्यक्रम, सिनेमे, नाटके, संगीत सगळेच पाश्चात्त्य संस्कृतीवर आधारित. हिंदी सिनेमा संगीत, मराठी भावगीते ऐकायची तर घरी. कामापुरती स्थानिकांशी देवघेव, त्यापलिकडे त्या समाजाशी अभिसरण असे नाही.

अस्मिता म्हणजे काय आणि त्यातही मराठी अस्मिता म्हणजे काय हा प्रश्न या संदर्भात तीव्र बनतो. प्रथम अस्मिता हा शब्द मी काय अर्थाने वापरत आहे, ते स्पष्ट करतो.

त्या आधी तिकडचे लोक माझ्याकडे काय दृष्टीने पहात असतील याचा तर्क करू. जगात कोठेही परक्याबद्दल पहिले मत त्याच्या दिसण्यावरून ठरते. म्हणजे त्यांचे पहिले मत - मी गोरा नाही. गोरे नसलेले इतर समूह - चिनी, अरब, आफ्रिकन वेगळे दिसतात म्हणून मी भारतीय उपखंडातील माणूस असावा.

मग मी पुणेरी, मराठी, इंजिनीअर - वगैरेचे काय झाले? त्या सगळ्याला ‘ओळख’ म्हणू. ओळख ही खाजगी, व्यक्तिनिष्ठ कल्पना झाली. अस्मिता ही सामुदायिक व्याख्या धरू. दोन्हींचा परस्परसंबंध आहे, पण इतर मराठी माणसेच नाहीत म्हटल्यावर मराठी ही ओळख होते, अस्मितेला वावच नाही. किमान संख्येची काही मराठी माणसे आजुबाजूला असली तर मराठी अस्मिता जन्म घेईल. तात्पर्य, अस्मिता संदर्भसापेक्ष असते. हे संदर्भही लवचिक असतात. उदाहरणार्थ, तिथल्या एखाद्या संमिश्र वर्णाच्या लोकांच्या कार्यक्रमात चार भारतीय असले, तर ती अस्मिता; भारतीयांच्या कार्यक्रमात चार महाराष्ट्रीय असले, तर ती अस्मिता, वगैरे. एक किमान समानता असली तरच अंतर्गत फरक अधोरेखित करता येतो. त्याबरोबरच, संदर्भ लहान होत गेला की अस्मिता अधिक धारदार होते हेही वरील उदाहरणावरून लक्षात यावे. संदर्भ मोठा होत गेला, तरी अस्मिता धारदार होते, पण तो मुद्दा पुढे पाहू.

हा लेख मराठी अस्मितेवर, म्हणजे समूहाधिष्ठित संकल्पनेवर आहे. त्यामुळे ‘ओळखी’चा फार विचार केलेला नाही. एकदोन ठिकाणी व शेवटी अस्मितेशी असलेल्या नात्याचा उल्लेख तेवढा केला आहे.

अस्मितेचे सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक असे तीन प्रमुख प्रकार मानले, तर मराठी अस्मिता जास्त करून सांस्कृतिक अर्थाने वापरली जाते. म्हणून लेखात त्याची तपासणी केली आहे. त्या अनुषंगाने राजकीय अस्मिता येतेच. या लेखापुरती आर्थिक अस्मिता म्हणजे मार्क्सची वर्ग ही संकल्पना मानता येईल - म्हणजे उत्पादनाची साधने ज्याच्या हातात, तो वरिष्ठ वर्ग. ('आधी' संस्कृती की 'आधी' अर्थकारण हा प्रश्न बाजूला ठेवू.) त्यामुळे ही संकल्पना महाराष्ट्रापुरती मर्यादित रहात नाही. भूमिहीन शेतमजूर, भटक्या जमाती जगभर आहेत. त्यात खास 'मराठी' असे काही नाही. आपापत: ते लोक या भौगोलिक प्रदेशात जन्माला आले, म्हणून त्यांना 'मराठी' म्हणायचे एवढेच.

राजकीय-सांस्कृतिक-आर्थिक अस्मितेबाबत दोन उदाहरणे देतो. १९५० च्या दशकात अमेरिकेतील काही कृष्णवर्णीयांनी मुस्लिम धर्म स्वीकारला. अमेरिकेचा मुख्य प्रवाह ख्रिश्चन धर्माचा. त्याच्याशी नाते तोडून आफ्रिका या आपल्या मूळच्या खंडाशी नाते जोडण्याचा हा प्रयत्न होता. आर्थिक मागण्यांसाठी ही सांस्कृतिक अस्मिता त्यांनी स्वीकारली. मात्र त्याचा त्या लोकांना अपेक्षित परिणाम झाला नाही. मुख्य प्रवाहात येण्याऐवजी, संवादाची शक्यता आणखीच दुरावली. आपल्याकडे डॉ. आंबेडकरांनी आरक्षणामार्गे राजकीय आणि आर्थिक अस्मिता आणि बौद्ध धर्म स्वीकारून सांस्कृतिक अस्मिता निर्माण केली. सांस्कृतिक अस्मिता शेवटी पावित्र्याच्या कोणत्यातरी व्याख्येवर आधारित असते. ती तुम्हाला पटो न पटो, पण एक सामाजिक गरज असते. मार्क्सवादाची ही एक प्रमुख त्रुटी आहे हे त्यांनी ओळखले. पण त्यांच्यानंतर या सांस्कृतिक अस्मितेचे परिवर्तन व्यक्तिपूजा, पुतळे उभारणे अशा नव्या कर्मकांडात झाले.

म्हणजे सांस्कृतिक अस्मिता निर्माण करण्यामागचा उद्देश आणि प्रत्यक्षात ती ज्या स्वरूपात अवतरते यात तफावत दिसते.

**मराठी अस्मितेचे घटक**

मराठी अस्मितेचा पहिला घटक अर्थातच मराठी भाषा आहे. मराठी अस्मिता असायला किमान पात्रता माणूस मराठी भाषिक तर हवा. मराठी नुसती यायलाच पाहिजे असे नाही तर ती मातृभाषाही असावी. दुसरा घटक भौगोलिक. हा माणूस महाराष्ट्रात जन्मलेला, वाढलेला असला तर उत्तमच. तिसरा घटक सांस्कृतिक - यात बऱ्याच गोष्टी येतात.

प्रथम भाषेचा विचार करू. मराठी भाषिक असे म्हणणे सोपे आहे पण मराठी भाषिक कोण हे ठरवणे कठीण आहे. खानदेशी मराठी, वऱ्हाडी मराठी, कोकणी मराठी का सदाशिवपेठी मराठी? प्रश्न फक्त स्थानिक बोलीचा रहात नाही. तर त्यात एक उतरंड आपोआपच येते. ''तुकारामाच्या रसाळ वाणीतून नामदेवाच्या ढसाळ वाणीपर्यंत मराठी साहित्याची वाटचाल झाल्या''ची खंत मध्यंतरी एका ज्येष्ठ साहित्यिकाने व्यक्त केली होती. 'शुद्ध' उच्चार, व्याकरण म्हणजे काय? ते अशुद्ध असले तर अस्सल मराठीपणा कमी होतो का वाढतो? महाराष्ट्र-मध्यप्रदेश, महाराष्ट्र-आंध्र, महाराष्ट्र-गुजरात या प्रत्येक सीमेवरच्या मराठीवर शेजारच्या प्रांतांच्या भाषेचा प्रभाव दिसतो. मग त्या मराठी भाषिकांची अस्मिता राज्याच्या कृत्रिम सीमांनी निश्चित होते का? ती उर्वरित महाराष्ट्राच्या मानाने पातळ होते का? परत, भाषेच्या बाबत एक महत्त्वाचा गुणधर्म लक्षात ठेवला पाहिजे. तो म्हणजे भाषा हा प्रवाह आहे. दर काही वर्षांनी ती बदलत असते.

संस्कृती तर आणखीच गहन प्रश्न निर्माण करते. धर्माखेरीज संस्कृतीमध्ये खाण्याच्या सवयी, शिष्टाचार, वेशभूषा (विशेषत: स्त्रियांची) या सगळ्याच गोष्टी येतात. त्या परंपरांनुसार घट्टही झालेल्या असतात आणि कालानुसार बदलतही असतात.

'एक मांड घोड्यावर जावे उत्तर हिंदुस्थानी
भीमथडीला भाकर तोवर गंगथडीला पाणी' -


मराठी संस्कृती इतकी एकरेषीय तेव्हाही नव्हती आणि आताही नाही.

धर्म आणि सामाजिक दैवते हे संस्कृतीचे महत्त्वाचे घटक. बहुतांश महाराष्ट्रीय हिंदू आहेत म्हणून 'खरी' मराठी अस्मिता हिंदू मानायची का! तशी मानली की लगेच निराळी धार्मिक दैवते, निराळी संत-मंडळी, निराळ्या श्रद्धा यांच्या निश्चितीवर वाद सुरू होतात. आणि मग मुसलमान, नवबौद्ध, जैन, बौद्ध, पारशी, ज्यू यांचे निराळे धर्म, निराळ्या श्रद्धा, निराळे शिष्टाचार 'मराठी' संस्कृतीत बसत नाहीत असे म्हणायचे का? ही गोष्ट तर महाराष्ट्रात पिढ्यान् पिढ्या रहात असलेल्या अहिंदूंची. या पिढीत कामधंद्यानिमित्त महाराष्ट्रात आलेल्यांचे काय? ते त्यांचे सांस्कृतिक वारसे (किंवा ओझी) घेऊन आलेले आहेत आणि ते वारसे (किंवा ओझी) राखण्याचाही प्रयत्न करत आहेत. त्यावर 'विविधता में एकता' किंवा 'तरी ते भारतीयच आहेत' या विधानांनी उत्तर मिळत नाही, उलट अस्मितेच्या संकल्पनेला अर्थ आहे का नाही याचीच शंका येते.

जी गोष्ट धर्माची तीच सामाजिक दैवतांची. गांधीजी, फुले-आंबेडकर, सावरकर-गोळवलकरगुरुजी, कार्ल मार्क्स या सगळ्यांचेच शब्दच्छलप्रेमी अनुयायी व अनुयायांचे अनुयायी महाराष्ट्रात आहेत. शिवाजी महाराज, त्यांच्या नावाने चालणाऱ्या संघटना आणि ज्ञानेश्वर-तुकाराम-रामदासांपासून गाडगे महाराज, तुकडोजी महाराज, गुळवणी महाराजांपर्यंत संतपरंपरा - यातली कोणती श्रद्धास्थाने 'हो' आणि कोणती 'नाही'?

मराठी अस्मितेचे निसरडे रूप यावरून लक्षात यावे. तत्त्वज्ञानातील एका प्रवाहानुसार तर अस्मिता अशी नसतेच. ना वैयक्तिक पातळीवर, ना सामूहिक पातळीवर. ज्याला आपण अस्मिता म्हणतो ती एक रस्सीखेच किंवा देवघेव असते. एका बाजूला त्या व्यक्तीच्या किंवा समुदायाच्या परिवर्तनाच्या शक्यता असतात. दुसऱ्या बाजूला बंधने असतात. परिवर्तनाच्या अनेक

शक्यतांपैकी कोणत्या दोन-चार शक्यता प्रत्यक्षात येतील हे ही बंधने ठरवतात. ती बंधने बृहत् समाजाकडून आली असतील किंवा समुदायाची अंतर्गत असतील. म्हणजे, अस्मिता ही कायमच्या ताणलेल्या रबरासारखी असते. या विचाराचा केवळ निर्देश केला. लेखासाठी अस्मिता एक दृढ, निश्चित संकल्पना आहे असे गृहीत धरू.




**अस्मितेच्या गुंत्यावर 'उपाय'**

अस्मितेच्या या गुंत्याची सोडवणूक दोन-तीन उपायांनी केली जाते. सहज सोपी सोडवणूक म्हणजे जातीपुरती अस्मिता मर्यादित ठेवणे. म्हणजे निदान हे विकल्प तरी कमी होतात. हा सोपा मार्ग स्वीकारला की चित्पावनांपासून त्वष्टा कासार/ नामदेव शिंपी संघटनांपर्यंत अस्मिता उभ्या करता येतात.

दुसरा उपाय म्हणजे मी 'आधी भारतीय मग मराठी' असे जाहीर करायचे. मग गणेशोत्सव मंडळांसारख्या (अखिल भारतीय) चर्मकार संघटना, (अखिल भारतीय) कैकाडी संघटना जन्माला येतात. तिसरा उपाय म्हणजे 'आधी भारतीय मग मराठी' न रहाता फक्त भारतीयच व्हायचे. म्हणजे अस्मिता विस्तृत करायची. फक्त हिंदू/मुसलमान/ दलितच रहायचे किंवा गांधीवादी/आंबेडकरवादी/हिंदुत्ववादी /मार्क्सवादी व्हायचे.

*एका अस्मितेने अनेक 'इतर' तयार होतात. ब्राह्मणातले देशस्थ ऋग्वेदी नसलेले ब्राह्मण, ब्राह्मण नसलेले इतर वर्ण, जातिव्यवस्थेबाहेरचे समूह, मग अहिंदू - त्यांच्यातील धर्म, पंथ हे सगळे 'इतर' तयार होतात. या 'इतरांचा' माझ्या अस्मितेला असणारा (अनेकदा काल्पनिक) संभाव्य धोका, त्या धोक्यांची कमी-जास्त तीव्रता, त्यांना सामोरे जाण्याच्या माझ्या उपाययोजना - अशी सगळीच प्रक्रिया सुरू होते. मुसलमानही 'इतर' आणि पारशीही 'इतर'. पण माझ्या अस्मितेला मुसलमानांकडून धोका जास्त, पारशांकडून कमी असे 'इतरां'मध्ये गुणात्मक भेद होतात.*

यावरून हे लक्षात येईल की अस्मिता 'इतर' निर्माण करते. भाषा जशी खाजगी नसते, तशी अस्मिताही खाजगी नसते. ''अगर होते सभी अपने, तो बेगाने कहाँ जाते'' या न्यायाने सगळेच जर देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असतील तर देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण या अस्मितेलाच अर्थ रहात नाही. पण हे 'इतर' हा एकमेव व एकजिनसी समूहही नसतो. एका अस्मितेने अनेक 'इतर' तयार होतात. ब्राह्मणातले देशस्थ ऋग्वेदी नसलेले ब्राह्मण, ब्राह्मण नसलेले इतर वर्ण, जातिव्यवस्थेबाहेरचे समूह, मग अहिंदू - त्यांच्यातील धर्म, पंथ हे सगळे 'इतर' तयार होतात. या 'इतरांचा' माझ्या अस्मितेला असणारा (अनेकदा काल्पनिक) संभाव्य धोका, त्या धोक्यांची कमी-जास्त तीव्रता, त्यांना सामोरे जाण्याच्या माझ्या उपाययोजना - अशी सगळीच प्रक्रिया सुरू होते. मुसलमानही 'इतर' आणि पारशीही 'इतर'. पण माझ्या अस्मितेला मुसलमानांकडून धोका जास्त, पारशांकडून कमी असे 'इतरां'मध्ये गुणात्मक भेद होतात.

डॉन क्वियोट ही एका स्पॅनिश कादंबरीतील व्यक्तिरेखा आहे. त्याच्याकडे एक खेचर असते आणि त्याचा एक अनुयायी असतो. पण डॉनला वाटते आपल्याकडे प्रचंड सैन्य आहे आणि आपण जगातील अनिष्ट वृत्तींचा संहार करणारे सेनापती आहोत. त्याला पवनचक्क्या हे शत्रू वाटत आणि तो त्यांच्यावर हल्ला करत असे. या व्यक्तिरेखेवर मी एक चित्र काढले होते. त्याचे नाव 'बहुतेक शत्रू मनामध्येच असतात'. त्या टोकाला गेले नाही तरी अस्मितेच्या या 'इतर' निर्माण करण्याच्या आणि अस्तित्वासाठी त्यांच्यावर अवलंबून असण्याच्या दृष्टिकोनात संघर्षाची बीजे असतात. प्रत्यक्ष संघर्ष होईल वा न होईल पण अस्मितेने सामाजिक नकारात्मकतेला खतपाणी मिळते.

छोट्या अस्मितेवर मोठ्या अस्मितेची झूल घेतली की संघर्षाची नवी बीजे पेरली जातात. मी फक्त मराठी असेपर्यंत मला मुंबईतल्या बिहारींचा तेवढा त्रास होत असे. किंवा फक्त तमिळ असेपर्यंत हिंदी भाषिकांचा. पण त्याबरोबर मी भारतीय झालो की मला पाकिस्तानचा त्रास होतो, चीनचा त्रास होतो, अमेरिकेचाही त्रास होऊ शकतो. परत मराठी बाणा कायम असल्याने बिहारींचा त्रास चालूच रहातो.

पुढच्या टप्प्यात अस्मिता विस्तारली आणि मी भारतीय झालो, की सगळे जगच 'इतर' होते. भारताखेरीज सगळे समाजच 'इतर' होतात. नुसत्या मराठी अस्मितेची व्याख्या इतकी कठीण तर भारतीय अस्मितेची व्याख्या अनेक पटींनी क्लिष्ट होऊ शकते.

**अस्मिता आणि असहिष्णुता**

अशा व्यापक अस्मितेचा खरा धोका निराळाच असतो. संघर्षाची बीजे असली तरी काही अस्मितांमध्ये इतर अस्मितांच्या मानाने हिंसेची शक्यता कमी असते. पर्यावरणवादी अस्मितेत राष्ट्रवादी अस्मितेपेक्षा अनुस्यूत हिंसा खूपच कमी असते. सरकार या संस्थेचा पोलीस हा जसा अविभाज्य भाग असतो, तसाच राष्ट्र या संस्थेचा लष्कर हा अविभाज्य भाग असतो. नेमक्या याच आक्रमकतेचे किंवा आक्रमकतेच्या धमकीचे काही संघटनांना आकर्षण असते. मग नव्याने 'सेना' 'छावा' 'ब्रिगेड' अस्तित्वात येतात. भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्षपदी नेमणूक होताच नीतीन

गडकरींनी 'सांस्कृतिक राष्ट्रवाद' हा आपला कार्यक्रम राहील असे जाहीर केले. तेही १९८४ चे शिखांचे शिरकाण, गोध्रा हत्याकांड ताजे असताना.

किंबहुना असहिष्णुता ही अस्मितेच्या नाण्याची दुसरी बाजू आहे. अस्मिता जेवढी व्यापक तेवढी असहिष्णुतेची व्याप्ती जास्त. त्यात अस्मितेवर आधारित संघटनेकडे राजकीय सत्ता आली तर प्रत्येक नागरिकाला त्या एकाधिकारशाहीखाली वावरावे लागेल.

समजा, जी. ए. कुलकर्णींच्या साहित्याने माझ्या वाचनात चांगली भर पडली आहे. शेक्सपिअरची नाटके, नाबोकोवचे लिखाण यांनीही चांगली भर पडली आहे. म्हणजे माझी मराठी अस्मिता विस्तारली असे म्हणता येईल. मराठी अस्मितेचे ठेकेदार माझे हे अमराठी वाचन सहनही करतील.

पण पुढचा असहिष्णुतेचा टप्पा लगेचच येतो. चंद्रकांत काकोडकरांच्या कादंबऱ्यांपेक्षा गाब्रिएल गार्सिया मार्क्वेझच्या कादंबऱ्या मला जास्त आवडतात किंवा मराठी भावगीतांपेक्षा पाश्चात्त्य पॉप जास्त आवडते असे जाहीरपणे म्हटले तर मी मराठी अस्मितेचा द्रोह करत आहे हा आरोप होण्याचीच शक्यता जास्त. ॲम्नेस्टी इंटरनॅशनल ही जगभरच्या मानवी हक्कांविषयी कार्यरत असणारी संघटना आहे. आज चीनमध्ये त्यांची वेबसाईट पहाणे हा गुन्हा आहे.

अस्मिता आणि सत्ता यांचा मिलाप जहरी असतो. मध्यंतरी इराणचे अध्यक्ष अहमेदिनिजाद अमेरिकेला गेले. तेथे त्यांनी एका विद्यापीठात भाषण केले. नंतर प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झाला. तेव्हा एका विद्यार्थ्याने त्यांना इराण सरकारचे समलिंगी संबंध ठेवणाऱ्यांबद्दलचे धोरण काय असे विचारले. त्यावर अहमेदिनिजादने उत्तर दिले, की इराणमध्ये असे 'विकृत' नाहीतच. वस्तुत: असे लोक जर सापडले, तर त्यांना जाहीर फाशी देणे हे त्या सरकारचे धोरण आहे.

**अस्मिताधिष्ठित संघटनांचे धोके**

उद्याच्या महाराष्ट्रात अशा अस्मिताधिष्ठित 'सेना' सत्तेवर आल्या तर हीच असहिष्णुता दिसेल. 'निर्णय फक्त मी घेणार' ही आठवण हिंदुहृदय सम्राट करून देत असतातच. 'राष्ट्र म्हणजे मी' हे एका फ्रेंच राजाचे उद्‍गार प्रसिद्ध आहेत. देवकांत बारूआंनी 'इंदिरा इज् इंडिया' असे तारे तोडले होते. लेखाच्या सुरुवातीला ओळख व्यक्तिनिष्ठ असते असे म्हटले आहे. पण सर्वंकष सत्ता असली, तर या ओळखीचे रूपांतर भ्रमात होऊ शकते. मग सत्ताधीशांची ओळखच सामुदायिक अस्मितेला गिळंकृत करते. हिटलर, स्टॅलिन, माओ यांच्या कारकीर्दीत हेच घडले.

अस्मितेच्या राजकारणाचा धोका म्हणजे एकच दंडक सगळ्या सभासदांना लावला जातो. अंतर्गत चर्चेला वाव रहात नाही. समाजाच्या दुबळ्या घटकांच्या संघटनांतही हा प्रकार आढळतो. 'समान अनुभव' या एका पूर्वअटीवर संघटना उभी रहाते पण प्रत्येकाचे अनुभव 'समान' नसले तरी संघटनेतील बलिष्ट गट ते तसे आहेतच हे गळी मारतो. स्त्रीवादी संघटनांमध्ये, अमेरिकेतील कृष्णवर्णीय संघटनांमध्ये हे अंतर्गत राजकारण आढळत आहे. कृष्णवर्णीय चळवळींमध्ये निर्णय प्रक्रियेतून स्त्रियांना कटाक्षाने वगळण्यात येत असे. 'बाहेरून' होणारी टीका तर 'ते लोक तसेच बोलणार' असे म्हणून विचारातही घेतली जात नाही. एखाद्या गोऱ्या माणसाला कृष्णवर्णीयांचा कितीही कळवळा असला तरी सुरुवातीच्या काळात त्याचा सल्ला मानला जात नसे. आपल्याकडे दलित चळवळीतही उच्चवर्णीयांबाबत हाच आकस आढळतो. मग संवादाची शक्यताच संपुष्टात येते.

याखेरीज अस्मिताधिष्ठित संघटनांना नक्की काय हवे याबाबत संदिग्धता आढळते. पश्चिमेत तरी आजवर मुख्य प्रवाहात सामील होण्याची मागणी होती. मग मुख्य प्रवाहात नको पण आम्हाला राजकीय स्वायत्तता द्या ही मागणी आली कारण मुख्य प्रवाहात जाणे यामुळे सांस्कृतिक अस्मितेला बाधा येऊ शकते हे लक्षात आले. आता राजकीय स्वायत्तता मिळूनही उपयोग होत नाही अशी काही संघटनांची धारणा झाली आहे. मग राजकीय आणि भौगोलिक स्वायत्तता द्या - म्हणजे, वेगळे राष्ट्रच होऊ द्या असा विचार वारंवार या ना त्या देशात पुढे येतो.

कॅनडातल्या क्युबेक प्रांतात बहुसंख्य जनता फ्रेंच बोलते. उरलेल्या कॅनडामध्ये इंग्रजी बोलली जाते. क्युबेक प्रांतावर कॅनडाचा सांस्कृतिक वसाहतवाद आहे, असा क्युबेकचा दावा आहे. केंद्र सरकारने इंग्रजीबरोबर फ्रेंच ही अधिकृत भाषा करणे, राजकीय स्वायत्तता वाढवणे अशी धोरणे राबवूनही क्युबेक हा कॅनडापासून विभक्त व्हावा, स्वतंत्र देश व्हावा ही मागणी कायम आहे. आपल्याकडे मिझोराम, मणिपूर, नागालँड इथे जशी सरकारे विकत घेऊन आणि लष्करी उपस्थितीने केंद्राने विभक्ती नियंत्रणात ठेवली आहे, तोच प्रकार तेथे आहे. (तेथे लष्कर नियुक्त नाही पण डावपेच तेच आहेत, या अर्थी तोच प्रकार.)

अमेरिकेत १९६०-७० मध्ये, काही केले तरी, म्हणजे सनदशीर मार्गाने गोरे उत्पादनाची साधने अंशत:ही आपल्या मालकीची करणार नाहीत अशी कृष्णवर्णीय चळीवळीतील काही कार्यकर्त्यांची खात्री पटली. तेव्हा त्यांनीही आम्हाला कसायला जमीन द्या, आम्ही वेगळे होतो ही मागणी केली होती.

तात्पर्य, मुख्य प्रवाह जर इतका संवेदनाशून्य असेल तर अशा मागण्या जोर धरतात. पण या ध्येयाची निश्चितता संघटनांमध्ये सतत आढळत नाही. आणि मुळात कोणतेच राष्ट्र सहजासहजी शकले होऊ देत नाही. म्हणजे हा व्यावहारिक पर्याय रहात नाही.

**अस्मितेचे मायावी योगदान**

अस्मितेवरील या सगळ्या आक्षेपांबरोबर अस्मितेचे योगदानही लक्षात घेतले पाहिजे. कोणतेतरी फायदे असल्याखेरीज अस्मिता उभ्या रहाणार नाहीत आणि टिकणारही नाहीत. केवळ सवय

म्हणूनही त्या जगतील पण त्यात अभिनिवेश नसेल.

अस्मितेचा पहिला फायदा म्हणजे सुरक्षिततेची भावना. मी एकटाच नाही तर माझ्याबरोबर या परिस्थितीत आणि असे अनुभव असणारे अनेक आहेत याचा दिलासा वाटतो. अस्मिता दुसरी एक मानवी गरज भागवते. ती म्हणजे पावित्र्याची कल्पना. जातिव्यवस्था, देशप्रेम, किंवा अगदी अंधश्रद्धा या शेवटी पावित्र्याच्या कोणत्यातरी व्याख्येवर अवलंबून असतात.

सुरक्षिततेच्या भावनेचे दोन पैलू पाहू. त्यासाठी परत पश्चिम युरोपचे उदाहरण घेऊ. तेथे राज्यसंस्था नागरिकाच्या अन्न-वस्त्र-निवारा या प्राथमिक आणि शिक्षण-आरोग्य या दुय्यम गरजा किमान पातळीवर का होईना, पण पाळण्यापासून थडग्यापर्यंत भागवते. अस्मिता उभ्या करण्यामागचे आर्थिक कारण तेथे दूर करण्यात आले आहे. त्यामुळे, समाज एकजिनसी नसूनही या प्रश्नावर उभ्या राहणाऱ्या संघटना तेथे आपल्याकडच्या मानाने कमी व अंशतःच आक्रमक आहेत. आपल्याकडे शोषितांच्या संदर्भात हा मुद्दा महत्त्वाचा आहे. भूमिहीन शेतमजूर दलित स्त्री हा भारतीय समाजातील सगळ्यात दुबळ्या घटकातील एक घटक घेऊ. ही स्त्री महाराष्ट्रात असेल किंवा आंध्रमध्ये. शासकीय तक्त्यांवर किंवा स्वयंसेवी संघटनांच्या आकडेवारीतील एक व्यक्ती एवढीच हिची ओळख. अशा स्त्रियांचे संघटन हिंदू/दलित/आदिवासी या अस्मितेवर करणे कितपत सयुक्तिक आहे? त्यामुळे मूळ प्रश्नाकडे दुर्लक्ष होते का?

आर्थिक सुरक्षिततेबरोबर मानसिक सुरक्षिततेचा ही प्रश्न येतो. ही असुरक्षितता जगाच्या विकसित, विकसनशील, अविकसित या तीनही भागात आढळते. पण त्यावर अस्मिता हे उत्तर नाही. कारण वर स्पष्ट केल्याप्रमाणे अस्मिता नवे संभाव्य शत्रू निर्माण करते व असुरक्षितेत भरच टाकते.

पावित्र्याबाबत, ते वैयक्तिक असो वा सामूहिक, ते मूलतः व वस्तुतः स्थानिक असते हे ओळखायला हवे. अस्मितेच्या अभिनिवेशात त्याला राष्ट्रीय, वांशिक, जागतिक रूप दिले जाते. या कृत्रिम विस्ताराने सामूहिक भ्रम निर्माण होतो. त्यासाठी पावित्र्याच्या व्यापक कल्पनेचे विकेंद्रीकरण आवश्यक आहे.

तात्पर्य, सामाजिक जीवनातून अस्मिता, अगदी विसर्जित नाही तरी त्यांचा प्रभाव कमी होणे श्रेयस्कर दिसते. आर्थिक, वांशिक, भाषिक, सांस्कृतिक वगैरे साधर्म्य असूनही ‘ओळख’ या वैयक्तिक पायावर आधारित समूह असू शकतात. विषमतेविरुद्ध संघर्ष करण्यासाठी अस्मितेची जरुरी नाही. किती ‘इतर’ किती बलिष्ठ करायचे हे आपणच ठरवायचे आहे.

*चंद्रशेखर पुरंदरे*

*www.art-non-deco.com*